(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT /Vol. XI / Issue – IV ISSN 2277-8063

# राजर्षी शाहू महाराज : एक शिक्षणमहर्षी

**प्रा. डॉ. विठ्ठल कल्लापा दळवी,** समाजशास्त्र विभागप्रमुख,कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कोवाड, ता. चंदगड, जि. कोल्हापूर Email - dalvivithal1976@gmail.com Mob – 9420355396

---

- **प्रस्तावना**

देशाला स्वातंत्र्य मिळून आज जवळजवळ ७५ वर्षे पूर्ण झाली. भारत सरकारने मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट 'हर घर तिरंगा' हे अभियान "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" म्हणून संपूर्ण भारतभर राबविले. या अभियानामध्ये देशातील सर्वच थरातील घटकांनी उत्स्फूर्तपणे पाठिंबा दिला. हे अभियान यशस्वी झाल्याचे सकृतदर्शनी दिसून आले.

प्रत्येक भारतीयाच्या चेहऱ्यावर आनंदोत्सव दिसून येत होता. हे तीन दिवस म्हणजे 'राष्ट्रीय सण' म्हणून सर्वत्र साजरा केला. शासकीय नोकरदार, भांडवलदार, व्यापारी, छोटे–मोठे उद्योजक इ. ना स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा अर्थ समजला आणि त्यांनी तो उपभोगलापण. परंतु दुसऱ्या बाजूने खरोखरच आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आहे का? असं म्हणणारा एक वर्ग आजही आपल्या देशामध्ये आहे. जो आजही शोषित, वंचित, उपेक्षित, गुलामगिरीत, दारिद्र्यात, सावकारी पाशात अडकलेला आहे. ज्यांना आजही दोन वेळचे पोटभर अन्न मिळवण्यासाठी दाही दिशा भटकंती करावी लागते. स्वातंत्र्याची ७५ री ओलांडली असली तरीही जात, धर्म, वंश, पंथ, भाषा इ. वरून समाजात जातीय तणाव, धार्मिक झगडे इ. वरून खून, मारामारी, जाळपोळ, अस्थिरता सुरूच आहे. जातीयता, बालविवाह, मद्यपान, रूढी परंपरा, अंधश्रद्धा इ. च्या विळख्यात आजही हा समाज भरडला जात आहे. इतकेच नव्हे तर महिलावरील अन्याय, अत्याचार यामध्ये वाढझालेली दिसून येते. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाबद्दल बोलायचे झाले तर 'हर घर तिरंगा' अभियानात वाड्या वस्त्या, झोपडपट्ट्या, चाळ इ. सहभागी होते का? रस्त्यावरचे फिरस्ते, शोषित, कष्टकरी, बालकामगार, विधवा, वृद्ध, बेघर अशा कितीतरी घटकांच्या चेहऱ्यावर अमृत महोत्सवाचे तेज दिसत होते का? या प्रश्नावर आज पंच्याहत्तरीत आत्मचिंतन करण्याची गरज निर्माण झाल्याचे दिसून येते. याबद्दल असे वाटते की आपण खरोखरच अजूनही पारतंत्र्यात आहोत. आम्हाला यातून मुक्त करण्यासाठी आज शाहू महाराजांची खऱ्या अर्थाने गरज आहे. 'बहुजन समाजाचे कैवारी' म्हणून आजही संपूर्ण महाराष्ट्रात नव्हे देशात त्यांचे नाव सुपरिचित आहे.

- **छ. शाहू महाराजांचे बालपण व शिक्षण**

छ. शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी श्रीमंत जयसिंगराव घाटगे व राधाबाई यांच्या पोटी झाला. त्यांचे घराण्यातील नाव यशवंतराव होते. महाराणी आनंदीबाईंनी छोट्या यशवंतरावांना दत्तक घेतले आणि त्यांचे नाव 'शाहू छत्रपती' ठेवण्यात आले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच त्यांना घोड्यावर बसणे, कुस्ती, शिकार यासारख्या खेळांमध्ये तरबेज बनविले. शाहू महाराजांच्या साध्या राहणीचा व मनमिळावू स्वभावाचा तेथील विद्यार्थी व शिक्षकांच्या मनावर विलक्षण प्रभाव पडला होता. सन १८९० ते १८९४ या काळात सर एस. एम. फ्रेझर यांच्या मार्गदर्शनाखाली धारवाड येथे इंग्रजी भाषा, राज्यकारभार, जगाचा इतिहास इ. विषयांचे परिपूर्ण शिक्षण घेतले. त्याच दरम्यान बडोदा येथील श्री. गुणाजीराव खानविलकर यांची कन्या श्रीमंत लक्ष्मीबाईसाहेब यांच्याबरोबर १ एप्रिल १८९१ रोजी शाहू महाराजांचा विवाह झाला आणि वयाच्या विसाव्या वर्षी २ एप्रिल १८९४ रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानंच्या राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतली.

- **छ. शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य**

शिक्षण हे मानवी जीवन विकासाचे एक साधन आहे. शिक्षणाच्या माध्यमातून शोषणमुक्त समाज निर्माण करता येतो. शिक्षणातूनच मानवी मूल्ये समाज मनावर बिंबविता येतात. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि व्यक्तीची प्रतिष्ठा ही सामाजिक मूल्य शिक्षणातूनच समजू शकतात. आपले हक्क कोणते आणि आपली कर्तव्ये कोणती याची जाणीव होण्यासाठी आणि आर्थिक, धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी समाजाला शिक्षणाची आवश्यकता असते. असे हे शिक्षण एखाद्या आक्रोडाच्या झाडासारखे असते. एखाद्या पिढीने हे झाड लावायचे असते. पुढे येणाऱ्या पिढीने त्या झाडाची गोड फळे चाखायची असतात. अशाप्रकारे शिक्षण हे मानवी हितासाठी समाजाने केलेली भांडवली गुंतवणूक असते. संपूर्ण मानवी जीवनाला व्यापून टाकणारी ती एक प्रक्रिया असते.

छ. शाहू महाराजांनी अज्ञान, अंधश्रद्धा आणि अनारोग्याने ग्रासलेल्या समाजाला सज्ञानी करण्यासाठी हाती बंडाचे निशाण घेतले. महाराष्ट्रभर लोकशिक्षणाची चळवळ सुरू केली. मानवाच्या सर्वांगीण जीवनाला स्पर्श करून जाणारे आणि जीवन सर्वार्थाने समृद्ध करणारे शिक्षण हे खरेखुरे 'जीवन–शिक्षण' होय हे ओळखून गल्लीपासून

दिल्लीपर्यंत शिक्षण सागर निर्माण केला. तत्कालीन धर्ममार्तंडाच्या आणि ब्रिटिश राजवटीच्या विरोधाला न जुमानता गोरगरिबांच्या झोपडीपर्यंत आणि पारध्यांच्या पालापर्यंत ज्ञानगंगा पोहोचवण्याचा ध्यास घेतला. गरीब माणसाला समृद्ध जीवनाकडे घेऊन जायचे असेल तर त्याच्यावर सर्वप्रथम शिक्षणाचा सुसंस्कार झाला पाहिजेत हे राजांनी ओळखले होते. अज्ञ माणसाच्या मस्तकात जोवर ज्ञानाचा प्रकाश पडणार नाही तोवर त्यांच्या पायात त्राण येणार नाही, हातात कौशल्य येणार नाही, मनात उमेद येणार नाही आणि त्यांना सुखाने कसे जगता यावे याचा अर्थही कळणार नाही हे राजांनी चांगले ओळखले होते. त्यामुळे अशा या अज्ञान समाजाच्या अंगणात प्रथम ज्ञानाची पहाट फुलवली. 'ज्ञान हे अमृत आहे' हे अज्ञ लोकांना पटवून दिले.

आपल्या समाजातील अज्ञान, दुर्लक्षित, दुर्बल, दु:खी, दिन, दलित आणि हीन लोकांना शिक्षण संजीवनीने बलशाली करण्याचा ध्येय लागलेले राजर्षी शाहू म्हणाले होते की, शिक्षणाच्या बाबतीत आमचा गतकाल म्हटला म्हणजे इतिहासाची एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनू आणि त्याच्या मागून झालेल्या शास्त्रकारांनी त्या त्या वेळेच्या ध्येयाला अनुसरून निरनिराळ्या जातींच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचले. खालच्या कमी जातीच्या लोकांना विद्या मंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले. म्हणून शिक्षणाच्या पायावरच सर्व समाजाची उन्नती करता येईल. या गोष्टीचे भान ठेवून राजर्षीनी आपल्या काळात सर्वांगीण आणि सक्तीच्या शिक्षणाचा पुरस्कार केला.

शिक्षणाशिवाय सारा समाज मतिहीन होईल, नीतीभ्रष्ट होईल, गतीहीन होईल आणि कायमचा खचून जाईल म्हणून राजर्षीनीं सर्वांसाठी शिक्षणाची पाणपोई उघडली.

- **मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण**

शिक्षण हे एक व्यक्ती विकास व समाज विकासाचे साधन आहे. दु:खाच्या दृष्टचक्रातून सुटका करून घेण्याचे ते महत्त्वपूर्ण साधन आहे. शिक्षणातून व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. आपल्या जीवनातील सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून सुटका करून घेणे आणि सर्व लोकांच्या भल्यासाठी उपयोगी पडणारे ज्ञान मिळवणे यातच खऱ्या शिक्षणाचे महत्त्व सामावलेले आहे. शिक्षणातून शरीर, बुद्धी आणि हृदय यांचा समतोल विकास साधता येतो. हे राजर्षीनी ओळखून कोल्हापूर संस्थानातील अशिक्षित, गरीब, स्त्री—पुरुषांना या शिक्षणाच्या प्रवाहात आणायचे आणि त्यांची अनिष्ट रूढी, परंपरांच्या जोखडातून मुक्तता करावी, त्यांच्यावरील मागासवर्गीय शिक्का पुसून टाकावा. एक माणूस म्हणून त्यांना समाजामध्ये समानतेची वागणूक मिळावी, त्यांच्या हक्क अधिकारांची त्यांना जाणीव व्हावी आणि त्यांची सर्वांगीण उन्नती व्हावी यासाठी छ. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचा निर्धार केला. त्यासाठी त्यांनी एक अभिनव प्रयोग केला. प्रत्येक खेड्यात एक एक शाळा स्थापन करायची व त्या शाळेत पगारी शिक्षक न नेमता खेड्यातीलच बहुसंख्य असणाऱ्या समाजातून 'वतनी शिक्षक' नेमायचा. त्यासाठी बापूसाहेब महाराजांच्या अध्यक्षतेखाली एक समिती ही स्थापन केली गेली होती. पण या अभिनव प्रयोगाला फारसे यश आले नाही. म्हणून राजर्षीनीं १९१७ मध्ये एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यामध्ये येत्या गणेश चतुर्थी पासून करवीर इलाख्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचे आहे. सध्या असलेल्या सर्व प्राथमिक शाळांतील फी सदर दिवसापासून माफ करण्यात येत आहे. सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची नियमावली तयार करण्यासाठी करमरकर, मराठे व प्रा. पंडितराव अशा तीन ब्राह्मण शिक्षण तज्ञांची समिती नेमली गेली. या समितीने तयार केलेल्या नियमावलीमध्ये 'सक्तीच्या शिक्षणाचा कायदा' खास जाहीरनामा काढून प्रसिद्ध करण्यात आला. या कायद्यान्वये शिक्षणात योग्य वयाची मुले शाळेत पाठवण्याची आईबापांवर सक्ती करण्यात आली. त्यांनी तशी पाठवली नाहीत तर त्यांना प्रत्येकी एक रुपया दर महिना दंड करण्याची तरतूद करण्यात आली. छ. शाहू महाराजांनी शिक्षणक्षेत्रात खालील प्रमुख कार्यक्रम नियोजनपूर्वक आखून ते अत्यंत निष्ठेने पार पाडले.

१. कारकीर्दीच्या पहिल्या वर्षीच शिक्षण क्षेत्रातील प्रचलित परिस्थितीचा आढावा घेऊन त्यात प्रगती सुचविण्यासाठी 'शिक्षण सुधारणा समिती'ची स्थापना केली.

२. प्राथमिक व माध्यमिक शाळांची संख्या वाढविली.

३. राजाराम कॉलेजचे महत्त्व व प्रतिष्ठा वाढेल असे प्रयत्न केले.

४. बहुजन समाजाच्या व गरीब घराण्यांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, पारितोषिके आदी स्वरूपांत शैक्षणिक सवलती उपलब्ध करून दिल्या.

५. शाळांतील अभ्यासक्रमांची जाणीवपूर्वक पुनर्रचना करण्यात आली.

६. शाळांची निर्मिती, इमारतींची दुरुस्ती, देखभाल, उत्पन्न—खर्च इत्यादी संबंधातील व्यवस्थेबाबत स्पष्ट नियम घालून देण्यात आले.

७. निर्धारित कसोट्यांना अनुसरूनच शाळांतील शिक्षकांची निवड करावी असे निर्बंध घालण्यात आले.

८. देवस्थानांनी शिक्षण कार्याला सर्वतोपरी साहाय्य करावे यासाठी खास जाहीरनामा काढण्यात आला.
९. शिक्षणावर होणाऱ्या वाढत्या खर्चाची तरतूद करण्यासाठी खास 'शिक्षणकर' बसविण्यात आला आणि करवीर संस्थानातील अधिकारी, जहागीरदार व सधन व्यक्ती यांजवर आणि प्रत्येक घरावर तो कर लावण्यात आला.
१०. अस्पृश्यांच्या मुलासाठी असलेल्या स्वतंत्र शाळा बंद करण्यात आल्या.
११.ग्रंथालयांना अनुदान देण्याची पद्धत सुरू करून गरीब विद्यार्थ्यांना ग्रंथ पुरविण्यासाठी 'पुस्तक–पेढी योजना' आखण्यात आली.
१२. मुलांना लष्करी शिक्षण देण्याच्या हेतूने एक 'इन्फंट्री स्कूल' सुरू केले.
१३. मुलांना तांत्रिक शिक्षण देण्यासाठी 'टेक्निकल'ची वाढ करण्यात आली.
१४. मुलींच्या शिक्षणाची वाढ करण्यासाठी विविध उपाय योजण्यात आले. मागासलेल्या वर्गातील विद्यार्थिनीच्या राहाण्या–जेवणाची मोफत व्यवस्था दरबारातर्फे १९१९ सालापासून करण्यात आली.
१५. संस्कृत शिक्षणाच्या प्रसारासाठी विविध योजना आखण्यात आल्या.
१६. शिक्षकांना खास शिक्षण देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन स्वतंत्र 'शिक्षक प्रशिक्षण केंद्र' १९१२ साली काढण्यात आले.
१७. गाव कामगार, पोलिस पाटील वगैरे अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यासंबंधी प्रशिक्षण देण्यासाठी दि. १५–५–१९१२ रोजी खास 'पाटील स्कूल' उघडण्यात आले.
१८. हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी व स्पर्धात्मक परीक्षा देण्यासाठी परदेशी पाठविण्यात आले.
१९. राजाराम कॉलेजमध्ये मुलींना शिक्षण फी माफ करण्यात आली.
२०. शाळांच्या देखरेखीसाठी सरकारनियुक्त सभासद असलेल्या स्कूल पंचकमिट्यांची पुनर्रचना करण्यात आली.
२१. प्रत्येक गावात शाळा काढून ती सुस्थिर करण्यासाठी 'वतनदार शिक्षक' योजना १९१२ साली सुरू करण्यात आली. त्यातील अडचणी लक्षात घेऊन १९१७ साली तिच्या ऐवजी 'पगारी शिक्षक' योजना अंमलात आणली.
२२. कोल्हापूरला मॅट्रिकच्या परीक्षेचे सेंटर १९१९–२० साली दरबारच्या प्रयत्नाने व स्वखर्चाने सुरू करण्यात आले.
२३. सर्वात महत्त्वाची व मूलगामी शैक्षणिक सुधारणा म्हणजे स. १९१२ साली त्यांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.

सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण ही त्यांची शिक्षण क्षेत्रातील मोठी कामगिरी होय. त्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी पुढीलप्रमाणे चतु:सूत्री कार्यक्रम राबविला.

१) दलित आणि अस्पृश्यांसाठी स्वतंत्र शिक्षण मंडळ असावे.
२) खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यासाठी शहरात वसतिगृहांची सोय करण्यात यावी.
३) समाजातील सर्व वर्गासाठी सक्तीचे प्राथमिक शिक्षण असावे, तसेच उच्च शिक्षणाची सायही करण्यात यावी.
४) समाजातील सर्व वर्गासाठी उपजीविकेसाठी आवश्यक असलेल्या शिक्षणाची आणि औद्योगिक शिक्षणाची सुविधा असावी.

अशाप्रकारे गरीब–श्रीमंत, उच्च–नीच सर्वांच्या मुलांसाठी समान शिक्षण देण्याची सोय झाली पाहिजे असे म्हणून त्यांनी ग्रामीण भागात अधिकाधिक शाळा सुरू करण्यावर भर दिला. जनता सुशिक्षित झाली तरच सामाजिक आणि आर्थिक विकास होईल हे जाणले. गाव तेथे शाळा सुरु करावी. त्यासाठी गावातील देऊळ, धर्मशाळा किंवा पार अशा ठिकाणी शाळा सुरु करण्याची व्यवस्था करण्यावर राजर्षींचा भर होता.

थोर समाजसुधारक म. फुले यांचा विचार शाहू महाराजांनी पुढे चालविला. शिक्षण हीच त्यांची सर्वसामाजिक सुधारणांची व प्रगतीची जननी मानली आणि समाजातील मागासलेल्या वर्गाची बौद्धिक गुलामगिरी नष्ट होण्यास त्यास किमान प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या सुधारण्याचा त्यांनी पुरस्कार केला. नाशिकच्या एका भाषणात त्यांनी म्हटले होते, 'खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड जुलमी जू लादले गेले आहे ते झुगारुन देण्याची शक्ती बहुजन समाजाचे अंगी येण्यास सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे.'

शाहू पूर्व काळामध्ये समाजामध्ये जातिव्यवस्था कठोर पाळली जात होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या जातीमध्ये समाज विभागला होता. उच्च ब्राह्मण जातीकडून कनिष्ठ जातीना विशेषत: शूद्रांना अनेक अधिकारापासून वंचित ठेवले होते. त्यांना माणूस म्हणूनही जगणे मुश्किल बनले होते. अशा कालखंडामध्ये सर्वांचा आधारकर्ता, रक्षणकर्ता, समाजक्रांतीचा राजा, दिन–दलितांचा कैवारी, सर्वांच्या जीवनामध्ये तेजस्वी पहाट फुलविणारा राजा म्हणून छ. शाहूंचे कार्य हे तत्कालीन पीडित, शोषित समाजाच्या जीवनात एक क्रांतिकारी पहाट झाल्याचे प्रत्ययास आले.

- **उच्च व व्यवसाय शिक्षण**

प्राथमिक शिक्षणाचा पाया दृढ केल्यानंतर उच्च शिक्षणापर्यंत वाटचाल करण्याचा त्यांचा निश्चय होता. याबाबतीत ते म्हणतात, प्राथमिक शिक्षणावर माझा भर आहे. तरी माध्यमिक व उच्च शिक्षणाकडे माझे लक्ष कमी

नाही. माझ्या रयतेमध्ये प्राथमिक व उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याची माझी इतकी जोराने खटपट चालले आहे. यावरून शक्य तितक्या लवकर माझ्या रयतेस स्वराज्य देण्याचे माझे धोरण आहे हे आपल्या ध्यानी येईलच. माझी प्रजा मराठी तिसरी इयत्ता शिकून तयार झाली असती तर, त्यांना राज्यकारभाराचे हक्क आनंदाने देऊन मी आजही विश्रांती घेतली असती. तथापि अधिकार दान करण्यापूर्वी सर्व लोकात विद्या प्रसार करण्याकडे अगोदर लक्ष देणे जरूर आहे.

प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच छ. शाहू महाराजांनी माध्यमिक, उच्च माध्यमिक व व्यवसाय शिक्षणास महत्त्व दिले. सन १८५१ मध्ये कोल्हापूर येथे सुरू झालेल्या एका इंग्रजी शाळेचे १९८१ साली राजाराम महाविद्यालयात रूपांतर झाले. तसेच सण १९०३ साली कोल्हापुरात 'ओब्रायन टेक्निकल स्कूल' ची स्थापना करून त्यातून विविध उद्योगासाठी शिक्षणाची व्यवस्था केली.

व्यावसायिक शिक्षण सर्वांना मिळण्यासाठी 'छत्रपती राजाराम औद्योगिक मंदिर' सुरू करून संस्थानातील वेगवेगळे व्यावसायिक शिक्षण घेण्याचे सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली. इतकेच नव्हे तर महाराजांनी ग्रामाचा कारभार व्यवस्थित चालविला जाण्यासाठी 'पाटील स्कूल व तलाठी स्कूल' सुरू करून तलाठ्यांना सर्वसाधारण जमाखर्च, कायदे, शांतता व व्यवस्था, महसूलविषयक दक्षता इ. विषयांचे शिक्षण सुरू केले. त्याचबरोबर त्यांनी विविध धार्मिक संस्कार धर्मशास्त्राप्रमाणे करता यावेत यासाठी 'सत्यशोधक शाळा' स्थापन केली. सन १९१९ मध्ये वैदिक शिक्षण देण्यासाठी 'श्री शिवाजी वैदिक विद्यालयाची' स्थापना करून त्याला 'वैदिक स्कूल' या नावाने ओळखले जायचे. तसेच लोहार काम, सुतार काम, गवंडी काम इत्यादींना तांत्रिक शिक्षण देता यावे यासाठी त्यांनी 'जयसिंगराव घाटगे इन्स्टिट्यूट' स्थापन केले. त्यांच्या शैक्षणिक कार्याचे सूत्र हे सर्वांना समान पातळीवर आणण्याचे होते. हे सर्व करत असताना त्यांनी बनारस हिंदू विश्वविद्यालय, पुण्याची डेक्कन एज्युकेशन सोसायटी इत्यादी शिक्षण संस्थानाही भरीव आर्थिक सहकार्य केले.

- **विद्यार्थी वस्तीगृह**

छ. राजर्षीनीं तत्कालीन परिस्थितीला अनुसरून पिचलेल्या, ग्रासलेल्या, वंचित, मागासलेल्या या बहुजन समाजाच्या उत्कर्षासाठी सर्वांगीण विकासाचे शस्त्र म्हणून आपल्या संस्थानात माध्यमिक, उच्च माध्यमिक व व्यावसायिक शिक्षण सर्वांसाठी खुले केले. हे शिक्षण बहुजन समाजातील गोरगरीब मुलांना विशेषत: ब्राम्हणोत्तर जातीतील मुलांना ज्यांना शिक्षणाचा अधिकार नाही, ज्यांची आर्थिक परिस्थिती नाही, ज्यांना शिक्षणाचा गंध नाही अशा मुला – मुलींना शिक्षण घेता यावे आणि दूरवरून येणाऱ्या मुलांसाठी राजर्षीनी वस्तीगृहाची स्थापना केली. विद्यार्थी वस्तीगृह कोल्हापूर बरोबरच पुणे, अहमदनगर, नागपूर येथेही स्थापन करण्यात आली. या वस्तीगृहामध्ये महाराष्ट्राबरोबरच गुजरात, आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश या इतर प्रांतातीलही विद्यार्थी राहत होते. वस्तीगृहाच्या माध्यमातून राजर्षीनी शिक्षण क्षेत्रात अद्वितीय स्वरुपाचे विधायक कार्य करून दाखवले. कोल्हापूर शहरात विविध शैक्षणिक सोयी उपलब्ध असल्या तरी त्याचा फायदा खेड्यातील विशेषत: गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना घेता यावा या हेतूने सण १८९६ च्या सुमारास कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजला संलग्न असे एक बोर्डिंग सुरू करण्यात आले. इतकेच नव्हे तर छ. शाहू महाराजांच्या कारकीर्दीत त्यांच्या प्रेरणेने व पुढाकाराने सन १९०१ ते १९२१ या कालावधीत पुढील २० विद्यार्थी वस्तीगृहे सुरू करण्यात आली.

१. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग
(सध्याचे श्री शाहू छत्रपती बोर्डिंग)
२. दिगंबर जैन बोर्डिंग
३. मुस्लिम बोर्डिंग
४. वीरशैव लिंगायत बोर्डिंग
५. मिस क्लार्क होस्टेल
६. दैवज्ञ बोर्डिंग
७. नामदेव बोर्डिंग
८. कायस्थ प्रभू बोर्डिंग
९. पांचाल ब्राह्मण बोर्डिंग
१०. सारस्वत बोर्डिंग
११. इंडियन ख्रिश्चन होस्टेल
१२. आर्य समाज गुरुकुल
१३. वैश्य बोर्डिंग
१४. ढोर चांभार बोर्डिंग
१५. शिवाजी वैदिक विद्यालय बोर्डिंग
१६. प्रिन्स शिवाजी फ्री मराठा बोर्डिंग
१७. सोमवंशीय आर्य क्षत्रिय बोर्डिंग
१८. सुतार बोर्डिंग
१९. नाभिक बोर्डिंग
२०. श्री देवांग बोर्डिंग

अशी विविध जाती धर्माची वस्तीगृहे छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीत सुरू करून सर्वधर्म समभावाची शिकवण आपल्या कार्यातून दाखवून दिली.

- **स्त्री शिक्षण**

आपल्या देशातील ब्राह्मणेत्तर वर्गासाठी शिक्षणाची किंकाळी फोडणारा पहिला महापुरुष म्हणून म. जोतिरावांचे नाव घेतले जाते. स्त्रियांना आणि अस्पृश्यांना शिक्षणाच्या सुविधा इंग्रजांनी दुर्लक्षित केल्याबद्दल म. फुलेनी प्रथमच सरकारची कान उघडणी केली. त्यासाठी त्यांनी लॉर्ड मेकॉलेच्या शिक्षण सिद्धांतास कडाडून विरोध केला. त्यांनी सर्वप्रथम स्त्रिया आणि अस्पृश्यांच्या विकासासाठी शाळा उघडल्या. भारतीय समाजात शिक्षणाचे नवे पर्व सुरू केले. स्त्री ही पुरुषाची माता आणि नेताही असते. यासाठी स्त्री शिक्षणाची नितांत गरज असते. एक आदर्श माता, आदर्श पत्नी, आदर्श शिक्षिका, आदर्श सेविका आणि आदर्श नेता व्हावी म्हणून स्त्रीला उपयुक्त अशा शिक्षणाची गरज असते. त्यातून स्त्रीमुक्ती होईल आणि तिची सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून सुटका होऊन तिला स्वावलंबनाने आणि स्वाभिमानाने जगता येईल हे राजर्षींनी जाणले. आपल्या कारकिर्दीत राजाराम महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना फी माफीची सवलत जाहीर केली. स्वत:च्या विधवा सूनबाई बरोबरच इतर स्त्रियांना शिक्षण देऊन शिक्षकी पेशाची नोकरी देऊन त्यांना स्वावलंबी बनविले. आणि हजारो स्त्रियांना शिक्षित केले. अनेक मुलींसाठी शाळा, शिक्षण संस्था उभ्या करुन त्याकाळात स्त्री सक्षमीकरणाच्या दिशेने पाऊल उचलले. त्यांच्यासाठी स्वतंत्र वस्तीगृहाची सोय करून खऱ्या अर्थाने स्त्री जीवनाच्या आयुष्यात एक सोनेरी पहाट आणण्याचे शिवधनुष्य या थोर राजाने उचलले.

- **समारोप**

अशाप्रकारे राजर्षींच्या ठायी सर्व व्यापक सहानुभूती आणि सर्वस्पर्शी विवेकशीलता होती. त्यामुळेच आपल्या भोवती वावरणाऱ्या पण शिक्षणाला मोताद झालेल्या पद्दलितांच्या, गोरगरिबांच्या मुलांसाठी ते प्राथमिक शाळेची कवाडे उघडत होते. प्राथमिक शिक्षणासाठी मोठी चळवळ उभा करून साऱ्या समाजाला जाग आणली. राजर्षींच्या शैक्षणिक चळवळीचे मुख्य सूत्र म्हणजे शिक्षण हे मक्तेदारीकडून सार्वजनिकतेकडे जावे असे होते. साऱ्या समाजाला समानतेच्या पातळीवर आणून त्यांचे हित साधावे हाच त्यामागे विचार होता.

एका कृतिशील समाजसुधारकाच्या भूमिकेतून प्राथमिक शिक्षणाची राजर्षींनी वाढविलेली व्याप्ती ही त्यांच्या सुदूर दृष्टीची, प्रगल्भ विचाराची आणि व्यापक मानवतेची द्योतक होती.

- **संदर्भसूची**


- डॉ. जयसिंगराव पवार, संपादक : राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, द्वितीयावृत्ती शाहू जयंती २६ जून २००७ भारतीय मुद्रणालय, कोल्हापूर
- माधवी कवी, संपादक : महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास, मीना चौधरी प्रकाशन, राजपथ अकॅडमी, पुणे २०१८
- प्राचार्य रा. तु. भगत : राजर्षी शाहू छत्रपती (जीवन व शिक्षण कार्य) रिया पब्लिकेशन्स, शाहूपुरी कोल्हापूर, ऑगस्ट २०१६
- प्रा. एन. डी. पाटील, डी. एस. थोरात, डॉ. विश्वनाथ पवार : महाराष्ट्रातील समाज सुधारक, फडके प्रकाशन कोल्हापूर, जानेवारी २०१५
- Dr. Vilas Sangave : Rajarshi Shahu Chatrapati Paper’s, Volume - V, Shahu Research Center, Shivaji University, Kolhapur, 1992
- धनंजय कीर : राजर्षी शाहू महाराज, पॉपूलर प्रकाशन, ताडदेव, मुंबई २००५
- कांबळे प्रविण प्रकाश : आबासाहेब राजर्षी शाहूंची सत्वपरीक्षा, मैत्रेयी प्रकाशन, नागाव, हातकणंगे, कोल्हापूर, मार्च २०२२
- प्रा. नानासाहेब साळुंखे : शाहुंच्या आठवणी, वृषाली प्रकाशन, कोल्हापूर, २०१६